## निशाणी क्र.१ वरील आदेश.

अर्जदार क्र.१ ते ३ यांनी सदरचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २–अ नुसार वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील **कै. शंकर पुरुषोत्तम देव** हे दि.११/०७/२०२४ रोजी देवआळी, ता.पेण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ हे कै. शंकर पुरुषोत्तम देव यांचे कायदेशीर वारस आहेत. तसा दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. या अर्जाच्या कामी नोटीस काढण्यात आली. सदरची नोटीस स्थानिक वृत्तपत्र रायगड वृत्तवेधमध्ये दि.१०/१०/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली. ती **नि.क्र.११** कडे दाखल आहे. दि.१०/१०/२०२४ पासून आजपर्यंत या अर्जाला कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. तसेच दि.१६/१०/२०२४ रोजी **नि.क्र.६** वरील जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. सदर जाहिरनाम्यास कोणीही हरकत घेतली नाही.

४. या अर्जाच्या कामी अर्जदार यांनी कै. शंकर पुरुषोत्तम देव यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मुळ प्रत **नि.क्र.१२** कडे दाखल केलेली आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी आपल्या ओळखपत्राच्या व्हेरिफाईड प्रती आणि रेशनकार्डच्या व्हेरिफाईड प्रती **नि.क्र.४** वरील यादीसोबत दाखल केलेल्या आहेत. अर्जदारांतर्फे पुरावा संपल्याची पुरशीस **नि.क्र.१५** कडे दाखल केली आहे.

५. अर्जदार क्र.२ याने या अर्जाच्या कामी **नि.क्र.१०** वर आपला पुरावा नोंदविलेला आहे. अर्जदार क्र.२ याने सादर केलेल्या पुराव्यावरुन कै. शंकर पुरुषोत्तम देव यांना अर्जदार क्र.१ ते ३ हे सरळ कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांना सदरचा वारस दाखला कायदेशीर कामाकरिता आवश्यक असल्याने त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब, पुरावा पहाता अर्जदार क्र.१ ते ३ हे कायदेशीर

वारस असल्याची औपचारिकपणे मान्यता देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** अर्जदार क्र.१ ते ३ यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** अर्जदार क्र.१ श्रीमती शैलजा शंकर देव, अर्जदार क्र.२ श्री. अमित शंकर देव आणि अर्जदार क्र.३ श्री. अभिषेक शंकर देव हे कै. शंकर पुरुषोत्तम देव यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ३ यांना वारस दाखला देण्यात येत आहे.

**३.** वारसाचे प्रमाणपत्र बॉम्बे रेग्युलेशन कायदयाप्रमाणे अर्जदारांनी योग्य तो मुद्रांक शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

स्वाक्षरी/-

**पेण.** **(श्रीमती अ. अ. काळे)**
**दिः १७.०३.२०२६.** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेण.**